# सहकाऱ्यांवर अण्णांची नाराजी

किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनीष सिसोदिया यांच्या मनमानीमुळे अण्णा नाराज असून टीम भंग करण्याचा अण्णांचा विचार असल्याचे त्यामध्ये म्हटले आहे. तसेच दिल्लीच्या रामलीला मैदानावरील आंदोलन यशस्वी झाल्यानंतर आपल्याला देशभरातून प्रचंड पत्रे आली आहेत. निवृत्त प्रशासकीय अधिकारी, सैन्याचे अधिकारी, विचारवंत आपल्याबरोबर काम करू इच्छित आहेत. यामुळे सर्वसमावेशक टीम तयार करण्याचा आपला विचार असल्याचेही या पत्रात म्हटले आहे. यानंतर प्रचंड खळबळ उडाल्याने अण्णांनी परुळेकरांवरच नाराजी व्यक्त करत आपला ब्लॉगच बंद करण्याचे जाहीर केले आहे. महाराष्ट्र सदनात पत्रकारांशी बोलताना अण्णा म्हणाले की, टीमच्या सदस्यांवर सारखे आरोप होत असल्यामुळे टीम बरखास्त करण्याचा विचार माझ्या मनात आला होता. परंतु तो निर्णय नव्हे तर एक विचार होता. परंतु अण्णा टीममध्ये फूट पाडण्यासाठी विरोधकांकडून अशाप्रकारचे आरोप केले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर मी विचार बदलला होता, असेही ते म्हणाले. मनात येणारे विचार मी अनेकदा लिहून ठेवतो. याचा अर्थ तो माझा निर्णय आहे असे नव्हे. मी टीमच्या सदस्यांवर समाधानी असून टीम बरखास्त करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचेही अण्णांनी पुढे म्हटले आहे. दरम्यान, राजू परुळेकर यांनी अण्णांनी त्यांना दिलेले पत्र जशाच्या तसेच आपल्या ब्लॉगवर टाकले आहे. आपल्याला हे पत्र मिळाल्यानंतर अण्णांचे खाजगी सचिव सुरेश पाठारे यांनी ते लगेच प्रसिद्ध करू नका, असे म्हटले होते. यामुळे आपण ते उशिराने जाहीर केले असेदेखील परुळेकर यांनी स्पष्ट केले आहे.